MHNS230001882025

**म.कौ.हिं.सं.का. अर्ज क्र. ०६/२०२५**

**निशाणी ०५ खालील आदेश**

**(राधिका वि. ज्ञानेश्वर व ई.)**

प्रस्तुतच्या अर्जाद्वारे अर्जदार यांनी कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम २३ अन्वये दरमहा रु.१५,०००/– अंतरीम पोटगी देण्याची विनंती केली आहे.

२. अर्जदार यांचे थोडक्यात कथन असे की, अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ याची पत्नी असून त्यांचा हिंदू धर्मशास्त्र व आदीवासी समाजाच्या चालीरितीप्रमाणे दिनांक २२.०५.२०२१ रोजी झाला असून आज देखील त्यांच्यामध्ये पती पत्नीचे नातेसंबंध कायम आहेत. गैरअर्जदार क्र. २ ते ४ हे अर्जदाराचे दिर, सासु व नणंद आहेत. लग्नानंतर अर्जदार ही गैरअर्जदारांकडे नांदण्यास गेली असता सुरुवातीचे सहा महिने गैरअर्जदार यांनी तिला व्यवस्थित नांदवले. त्यानंतर त्यांनी अर्जदारास लग्नातील मानपाणाचे व हुंडयाचे कारणावरुन शारिरीक, मानसिक त्रास देण्यास सुरुवात केली. गैरअर्जदार क्र.१ हा गैरअर्जदार क्र. २ ते ३ यांच्या सांगण्यावरुन अर्जदारास नेहमी शिवीगाळ करुन धमक्या देत असे. तसेच गैरअर्जदार क्र. ३ हि 'माझा मुलगा हा कमावता आहे, हुंडयावाल्या पोरी चिकार मिळतील, हि पिडा पहिले घरातुन बाहेर काढा' असे म्हणुन अर्जदारास हिनवत असे. एप्रिल २०२३ मध्ये गैरअर्जदारांनी संगनमताने अर्जदारास शिवीगाळ करुन मारहाण केली, तसेच अर्जदाराचे हातावर, तोंडावर जळत्या लाकडाने चटके देवून याबाबत कोणाला सांगितले तर 'तुझा मुडदा पाडु' अशी धमकी दिली. मार्च २०२४ मध्ये गैरअर्जदार क्र. ३ हिने अर्जदाराचे स्त्रीधन काढुन घेवुन तिला जबदरस्तीने तिचे माहेरी सोडुन दिले. त्यानंतर गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदाराच्या माहेरी जावुन 'तुमचा आमचा संबंध राहीला नाही, तुमची जीवंत मुलगी तुमचे ताब्यात दिली आहे, आमचा झालेला खर्च भरुन द्या, नाहीतर तुमचेवर केस करेल' अशी धमकी दिली. तेव्हापासून अर्जदार ही तिचे माहेरी राहत आहे.

३. अर्जदारास कोणताही कामधंदा होत नाही व तिला उत्पन्नाचे असे कोणतेही ठोस साधन नाही. गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदाराच्या उदरनिर्वाहीची कोणतीही सोय केलेली नाही. गैरअर्जदार यांची आर्थिक परिस्थिती चांगली आहे. गैरअर्जदार क्र. १ कंपनीत नोकरीस असुन त्यास प्रतिमहा २०,०००/– रुपये पगार मिळतो. त्याचप्रमाणे गैरअर्जदारांची खडकेद येथे जिरायती व बागायती शेती असुन त्यापासुन दरवर्षी ५ लाख रुपये उत्पन्न मिळवतात. गैरअर्जदार क्र.१ वर अर्जदाराशिवाय ईतर कोणतीही जबाबदारी नाही. त्यामुळे अर्जदाराने गैरअर्जदारांकडून अंतरिम अर्थसहाय्य म्हणुन दरमहा रु. १०,०००/– व घरभाडे म्हणुन रु. ५०००/– दरमहा मिळावे अशी विनंती केली आहे.

४. गैरअर्जदार यांनी त्यांचा जबाब नि.क्र.११ अन्वये दाखल केले आहे. गैरअर्जदारांनी अर्जदारासोबतचे नातेसंबंध मान्य केले असून इतर मजकुर फेटाळला आहे. त्यांचे म्हणणे थोडक्यात असे की, लग्नानंतर अर्जदार ही तीन महिने व्यवस्थीत राहीली. त्यानंतर अधुन मधुन ती मतभेद करु लागली. अर्जदार ही कधीही गैरअर्जदारांसोबत योग्य प्रकारे वागत नव्हती. गैरअर्जदार क्र. ४ विवाहीत असुन ती तिच्या सासरी राहत असल्याने कधीही माहेरी येत नव्हती. अर्जदार ही गैरअर्जदार क्र. १ यास 'तुमचे घर शेणामातीचे आहे, ते मला आवडत नाही, तसेच तुम्ही मला आवडत नाही, शेतीचे काम आवडत नाही असे म्हणुन त्याचा अपमान करत असे. अर्जदार ही गैरअर्जदार क्र. १ घरी नसतांना त्यांना न विचारता माहेरी निघुन जात असे व १ ते २ महिने परत येत नसे. गैरअर्जदार क्र. १ अर्जदारास माहेरी घेणेकामी गेले असता अर्जदाराच्या आईने त्यांना काठीने मारन्याचा प्रयत्न केला व 'तु आमचा कोणीही लागत नाही, तु आमच्याकडे कुत्र्यासारखा घरात घुसतो, परत आमच्या घरी येवू नको, माझी मुलगी वाटेवर पडलेली नाही, तु तिला घ्यायला येवू नको, भिका–याच्या घरात आमच्या मुलीला आम्ही पाठवणार नाही' असे बोलुन गैरअर्जदाराचा अपमान केला. गैरअर्जदारांनी अर्जदार हिस नांदण्यास घेऊन जाण्याचा स्वतः, नातेवाईक व मध्यस्थांमार्फत वांरवार प्रयत्न केले. तसेच अर्जदारास नांदणेस येणेकामी वकीलांमार्फत नोटीस पाठवुन देखिल अर्जदार नांदण्यास आली नाही. अर्जदार ही स्वतःहून माहेरी राहत असल्याने व गैरअर्जदारांनी अर्जदारास कोणत्याही प्रकारे

शारिरिक व मानसिक त्रास दिलेला नसल्याने ती कोणतीही पोटगी देण्यास पात्र नाही. त्यामुळे अर्जदारांचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती गैरअर्जदारांनी केली आहे. .

५. अर्जदार यांचा अर्ज व कागदपत्रे विचारात घेता माझ्यासमक्ष खालील मुद्दे निष्कर्षासाठी उपस्थित झालेले असुन त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसासह देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रथमदर्शी गैरअर्जदार यांच्याकडून अर्जदारांवर कौटूंबिक हिंसाचार झाला असे शाबीत होते काय ? | **...होय.** |
| २. | अर्जदार हे त्यांनी मागणी केल्याप्रमाणे अंतरीम पोटगी मिळण्यास पात्र आहेत काय ? | **अंशतः होय.** |
| ३. | आदेश काय ? | **अंशतः मंजुर** |

**कारणमिमांसा**

**मुद्दे क्र.१ ते ३ करीता –**

६. मुद्दे क्र.१ व २ हे एकमेकांशी संलग्न असल्याने विवेचनाची पुनरावृत्ती टाळण्याकरीता त्यांचे विश्लेषण एकत्र करण्यात येत आहे. अर्जदार हिने तिच्या अर्जामध्ये गैरअर्जदारांकडून होणा–या शारिरीक व मानसिक त्रासाबद्दल इत्यंभुत विवेचना केली आहे. अर्जदार हिने तिच्या अर्जात ती मार्च, २०२४ पासुन तिच्या माहेरी राहत असल्याचे कथन केलेले आहे. तेव्हापासुन गैरअर्जदार क्र. १ याला अर्जदाराच्या पालपोषणाकरिता कोणतीही जबाबदारी उचलली नाही असे प्रथमदर्शनी दिसून येते. गैरअर्जदारांनी त्यांचे लेखी म्हणणे दाखल केले असून त्यामध्ये त्यांनी अर्जदारांचे सर्व म्हणणे नाकारले आहे. मात्र अर्जदाराने तिच्या अर्जात व प्रतिज्ञात्रात तिच्या विरुध्द कौटुंबिक हिंसाचार झाल्याचे नमुद केलेले असुन त्यावर अविश्वास ठेवण्याचे कोणतेही कारण दिसुन येत नाही.

७. सद्या अर्जदाराच्या उपजिविकेचा प्रश्न निर्माण झाल्याचे दिसुन येते. कारण अर्जदार ही मागिल काही महिन्यांपासुन गैरअर्जदार क्र. १ पासुन वेगळे राहत आहे. अशा परिस्थितीत अर्जदारास त्वरीत अंतरिम

पोटगी मिळणे आवश्यक आहे. अर्जाचा अंतिम निकाल होईपर्यंत दरम्यानच्या काळात अर्जदाराच्या मुलभुत व अ ावश्यक गरजा भागविण्यासाठी तिला अंतरिम पोटगी मिळणे आवश्यक आहे. कोणतीही भारतीय विवाहीत स्त्री इतक्या सहजपणे काहीतरी असाधारण कारण घडल्याशिवाय पतिपासुन अलिप्त राहत नाही. जर तिच्या पतीने व पतीच्या नातेवाईकांनी त्रास देवून वेगळे राहण्यास भाग पाडले तर अशा परिस्थितित नाईलाजाने विवाहीत स्त्रीला तिच्या माहेरी रहावे लागते. प्रस्तुत प्रकरणात प्रथम दर्शिनी असे परिस्थति दिसुन येते. अर्जदार ही गैरअर्जदारापासुन होणा–या मानसिक व शारिरिक त्रासामुळे माहेरी राहत असल्याचा अनुमाण काढता येवू शकतो. त्यामुळे हा देखील कौटुंबिक हिंसाचाराचा एक भाग आहे.

८. अर्जदार ही माहेरी राहत असल्यापासुन तिच्या दैनंदिन गरजांकरीता गैरअर्जदार क्र. १ यांना कोणतेही आर्थिक तरतुद केल्याचे दिसुन येत नाही व तसा पुरावा देखील गैरअर्जदार यांनी अभिलेखावर सादर केलेला नाही. पत्नीस सांभाळण्याची कायदेशीर व नैतिक जबाबदारी असतांना देखील गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदाराच्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी कोणतीही तरतुद केल्याचे दिसुन येत नाही. उलट गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदाराचे आर्थिक जबाबदारी घेण्यास टाळाटाळ करत असल्याचे दिसुन येते.

९. अर्जदार यांनी गैरअर्जदार क्र.१ याचेकडुन दरमहा १५,०००/– अंतरीम पोटगीची मागणी केली आहे. अर्जदार हिने गैरअर्जदार यांच्या मिळकतींचे ७/१२ उतारे नि.क्र.१७ अन्वये दाखल केलेले आहे. अर्जदार हीने गैरअर्जदार क्र. १ हा कंपनीत नोकरीस असुन त्यास दरमहा रुपये २०,०००/– पगार मिळतो तसेच गैरअर्जदार यांना खडकेद येथे जिरायती व बागायती क्षेत्र असुन त्यापासुन त्यांना दरवर्षी रुपये ५ लाख उत्पन्न मिळते असे कथन केले आहे. पत्नीचा सांभाळ करणे हे गैरअर्जदाराचे कर्तव्य आहे. गैरअर्जदार यांनी अर्जदार माहेरी गेल्यापासून तिला आर्थिक साहाय्य केलेले दिसून येत नाही. गैरअर्जदार क्र.१ हा धडधाकट असून कोणतेही काम करुन उत्पन्न मिळवू शकतो. त्यामुळे गैरअर्जदाराचे संभाव्य उत्पन्न विचारात घेता अर्जदारास दरमहा ३,०००/– रुपये अंतरीम पोटगी देणे योग्य व उचित होईल.

१०. वर विवेचन केल्याप्रमाणे गैरअर्जदार यांनी प्रथमदर्शनी अर्जदार यांचा कौटुंबिक हिंसाचार

केल्याचे दिसुन आल्याने व गैरअर्जदार क्र.१ याचे संभाव्य उत्पन्न विचारात घेता मी मुद्दा क्र.१ याचा निष्कर्ष होकारार्थी, मुद्दा क्र.२ याचा अंशतः होकारार्थी व मुद्दा क्रमांक ३ साठी खालीप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

**१.** गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदारास एकत्रितरित्या दरमहा रुपये ३,०००/- अर्ज दाखल तारखेपासून अंतरीम पोटगी वजा अनुतोष कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम २३ प्रमाणे द्यावी.

**२.** आदेशाची प्रत दोन्ही पक्षकारांना मोफत द्यावी.

**दिनांकः-**१८.०९.२०२५

**सही/-**
( श्रीमती. ए. सी. रोकडे )
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, इगतपुरी,**
**ता. इगतपुरी, जि. नाशिक.**